क्र.साप्रवि/रवका/न.क्र.९/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारित इमारत,
तळ मजला, धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

# प्रशासकीय परिपत्रक क्र. १८६ दिनांक २२ / १० / २००८

विषय : सन २००७-२००८ या वर्षासाठी सानुग्रह अनुदान आणि वेतन सुधारणेच्या अधीन अग्रिम रकमेचे प्रदान करणेबाबत.

.....

पूर्वीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या विभाजनानंतर महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या कामगिरीची वर्षनिहाय तुलना केली असता वीज गळतीचे प्रमाण कमी करणे, थकबाकीची वसुली, थकबाकीदाराविरुद्ध कारवाई करणे, वीज चोरीविरुद्धची मोहिम, वीज बील वसुलीच्या कार्यक्षमतेत वाढ व ऊर्जा लेखांकन इत्यादी क्षेत्रामध्ये उल्लेखनीय सुधारणा झाल्याचे आढळून आलेले आहे. त्यामुळे कंपनीला विश्वास वाटतो की, कर्मचाऱ्यांनी सातत्याने केलेल्या प्रयत्नांचे/कामांचे हे फळ आहे. म्हणून सन २००७-२००८ या आर्थिक वर्षासाठी सर्व कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान व दि.०१.०४.२००८ पासून देय असलेल्या वेतन सुधारणेच्या अधीन अग्रिम रक्कम अदा करावी असा प्रस्ताव कंपनीच्या विचाराधीन होता. या बाबी सर्व कंपन्यांचे सामाईक विषय असल्याने तिन्ही कंपन्यांच्या व्यवस्थापकीय संचालकांच्या बैठकीत त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

२. आता, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांनी संचालक (वित्त) व संचालक (संचलन) यांच्याशी विचारविनिमय करुन खालील बाबीस मान्यता दिलेली आहे.

क) सन २००७-२००८ या आर्थिक वर्षात कार्यरत असलेल्या सर्व अधिकारी/कर्मचारी तसेच रोजंदारी कामगार यांना रु.७०००/- (रु.सात हजार फक्त) इतके सानुग्रह अनुदान अदा करण्यात यावे.

ख) दिनांक ०१.०४.२००८ पासून वेतन सुधारणेच्या अधीन देय असलेल्या थकबाकीच्या रक्कमेपोटी अग्रिम रक्कम रु.३०००/- (तीन हजार फक्त) सर्व अधिकारी/कर्मचारी यांना अदा करण्यात यावी व सदरची अग्रिम रक्कम ही वेतन सुधारणेनंतर द्यावयाच्या थकबाकीच्या रक्कमेत समायोजन करण्यात यावी.

३. सन २००७-२००८ या आर्थिक वर्षात अंशकालिक काम केलेले कर्मचारी त्यांच्या सेवेच्या कालावधीप्रमाणे यथा प्रमाण सानुग्रह अनुदान मिळण्यास पात्र असतील.

४. सन २००७-२००८ या आर्थिक वर्षासाठी देण्यात येणारे हे सानुग्रह अनुदान केवळ याच वर्षासाठी द्यावयाचे असून भविष्यामध्ये हक्क म्हणून याचा पूर्वदाखला देता येणार नाही.

५. सानुग्रह अनुदान व वेतन सुधारणेच्या अधीन देण्यात येणाऱ्या अग्रिम रकमेचे प्रदान दि.२७.१०.२००८ रोजी करण्यात यावे. सानुग्रह अनुदान व वेतन सुधारणेच्या अधीन द्यावयाची अग्रिम रक्कमेचे आहरण करुन ते प्रशासकीय परिपत्रक जारी केल्याच्या तारखेस, कर्मचारी ज्या ठिकाणी कार्यरत असतील तेथे सन २००७-२००८ या आर्थिक वर्षात यापूर्वी ते कोठे कामास होते हा मुद्दा विचारत न घेता, त्यांना सदर रक्कम अदा करण्यात यावी. अग्रिम व सानुग्रह अनुदानाची रक्कम प्रत्यक्षात अदा करण्यापूर्वी संबंधीत कर्मचाऱ्याच्या सेवापुस्तिकेत सदरची रक्कम अदा केल्याची नोंद घ्यावी.

६. आहरण व संवितरण अधिकाऱ्याने सानुग्रह अनुदान व अग्रिम रकमेबाबतचे मागणी पत्र व्यवस्थापक (वि.व ले., अर्थोपाय शाखा), हाँगकाँग बँक इमारत, मुंबई यांना ताबडतोब पाठवावे.

७. हे प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या www.mahadiscom.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

सही/-
(कर्नल राहूल गोवर्धन, सेवानिवृत्त)
कार्यकारी संचालक (मासं)

प्रति,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या प्रेषण यादीप्रमाणे सर्वांना.